# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक :
०२०—२५६९१२३३
२५६०१२५७
२५६०१२५८
२५६०१२५९

शैक्षणिक विभाग
गणेशखिंड, पुणे—४११ ००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०—२५६९१२३३
वेबसाइट : www.unipune.ac.in
इ—मेल : approval@unipune.ac.in

संदर्भ क्र. :सीसीओ/ 2922

दिनांक : १४ ऑक्टोबर, २०१४

## प रि प त्र क

मा. प्राचार्य/ अध्यक्ष
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी
संलग्नित सर्व महाविद्यालये

महोदय,

संलग्नित महाविद्यालयांतील / मान्यताप्राप्त संस्थांतील शिक्षकांच्या नेमणुका करण्यासंदर्भात पुणे विद्यापीठ परिनियम ४१५ मध्ये उल्लेख करण्यात आलेला आहे. काही कारणाने महाविद्यालयास अथवा मान्यताप्राप्त संस्थेस कायमस्वरूपी शिक्षकांच्या नेमणुका करता आल्या नाही तर तात्पुरत्या स्वरूपामध्ये शिक्षकांच्या नेमणुका करण्याबाबतचा उल्लेख परिनियम क्र. ४१५ (३) मध्ये करण्यात आलेला आहे. त्यामुळे महाविद्यालयांमध्ये / मान्यताप्राप्त संस्थांमध्ये शिकणा-या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळता येते.

तसेच महाविद्यालयांमध्ये विद्यापीठाकडून कायमस्वरूपी पदे भरण्यासाठी समिती गठीत केली जाते. अशा समित्यांचा अहवाल निवड समिती ज्या दिवशी गठीत होते त्या दिनांकापासून ७२ तासांच्या आत विद्यापीठास सादर करणे बंधनकारक आहे.

काही महाविद्यालये शैक्षणिक वर्ष संपून गेल्यानंतर, त्या शैक्षणिक वर्षाचे तात्पुरत्या स्वरूपातील शिक्षकांचे मान्यतेचे प्रस्ताव पुढील शैक्षणिक वर्षामध्ये विद्यापीठाकडे सादर करतात. सदर वस्तुस्थितीचा विचार केल्यास ज्या शैक्षणिक वर्षामध्ये ज्या महाविद्यालयांनी स्थानिक पातळीवर तात्पुरत्या स्वरूपात शिक्षकांच्या नेमणुका केलेल्या आहेत असे अहवाल ज्या दिवशी निवड समितीची सभा घेण्यात आली आहे त्या दिनांकापासून ७२ तासांच्या आत विद्यापीठात अहवाल सादर करणे बंधनकारक आहे.स्थानिक निवड समितीचे अहवाल ७२ तासांच्या आत कार्यालयात सादर न झाल्यास त्यावर कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पूर्वीच्या कोणत्याही तात्पुरत्या स्वरूपात केलेल्या शिक्षकांच्या नेमणुकांना यापुढे मान्यता दिली जाणार नाही. तसेच तात्पुरत्या स्वरूपात केलेल्या शिक्षकांच्या नेमणुकांसंदर्भातील अहवाल ज्या शैक्षणिक वर्षामध्ये प्राप्त होतील त्याच शैक्षणिक वर्षामध्ये शिक्षकांच्या नेमणुकांच्या प्रस्तावांना मान्यता देण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

आपला,

१४/१०/१४

उपकुलसचिव
(शैक्षणिक विभाग)